
ePaper

शाईप्रकरणी राज ठाकरेंनी घेतली चंद्रकांत पाटलांची बाजू



वर्ष - 6 । अंक - 239 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | ।मंगळवार।दिनांक 13 डिसेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- पुणे विद्यापीठात वसतिगृहासाठी विद्यार्थ्यांचे आंदोलन
- महापालिका कर्मचाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण !
- "सवंग प्रसिद्धीसाठी काहीही करू नका"

# पिंपरी-चिंचवडसाठी सुधारित विकास आराखडा!

## नागरिकांना मत कळविण्याचे आवाहनः नगररचना विभागाच्या वतीने तयारी सुरु

।पिंपरी।
।महाईन्यूज।प्रतिनिधी।



महाराष्ट्र शासनाच्या नगररचना आणि मूल्य निर्धारण विभागाच्यावतीने पिंपरी-चिंचवड महापालिकेचे सुधारित प्रारूप विकास योजना तयार करण्याचे कामकाज सुरु असून, नागरिकांनी शहरातील आवश्यक सेवा सुविधा प्रस्तावित करण्यासाठी विविध माध्यमातून आपले मत विकास योजना कार्यालयास कळवावे, असे आवाहन विकास योजना, विशेष घटक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण घटकाचे नगररचना उपसंचालक विजय शेंडे यांनी केले आहे.

शहरात नव्याने करावयाची विकास कामे, आरक्षणे, नियोजित प्रकल्पांच्या अनुषंगाने प्रारूप विकास योजना तयार करण्याचे काम महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमाद्वारे करण्यात येते. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विद्यमान जमीन वापराबाबत नकाशा तयार करण्यात आला असून नकाशा महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रकाशित केला आहे.

प्रारूप विकास योजना सुधारित करण्याचे काम शेवटच्या टप्प्यात असून अंतिम विकास योजना प्रसिध्द करण्याच्या दृष्टीकोनातून प्रारूप विकास योजनेचे महापालिकेला लवकरच हस्तांतरण करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर आवश्यक सेवा सुविधा प्रस्तावित करण्यासाठी तसेच शहरातील नागरिकांचे मत किंवा कल जाणून घेण्यासाठी सूचना करण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे.

### विकास आराखडा लोकाभिमुख व दोषविरहित व्हावा

दरम्यान, प्रारूप विकास योजनेच्या अनुषंगाने विविध शासकीय विभाग, भागधारक संस्था तसेच महापालिकेच्या विविध विभागांनी भविष्यात लागणाऱ्या सेवा सुविधांच्या जागांची मागणी नगररचना आणि मूल्य निर्धारण विभागाकडे सादर केली आहे. विकास योजना तयार करण्याच्या प्रक्रियेत नागरिकांचा जास्तीत जास्त सहभाग असावा. त्यांच्या आशा आकांक्षांचे प्रतिबिंब प्रारूप विकास योजनेत दिसावे. तसेच विकास आराखडा लोकाभिमुख व दोषविरहित होण्यास मदत व्हावी यासाठी नागरिकांनी त्यांचे मत कळवावे असे आवाहन शासनाच्या नगररचना आणि मूल्य निर्धारण विभाग तसेच पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने नागरिकांना करण्यात येत आहे.

### आवश्यक सेवा सुविधांबाबत मत व सूचना येथे पाठवावेत...

नागरिकांनी मोठ्या संख्येने प्रारूप विकास योजनेच्या अनुषंगाने आवश्यक सेवा सुविधांबाबत मत व सूचना DDTPPCMCDP_PUNE@REDIFFMAIL.COM या विकास योजना कार्यालयाच्या मेल आयडीवर अथवा उपसंचालक, नगर रचना, विकास योजना विशेष घटक, पिंपरी चिंचवड महापालिका व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण कार्यालय, पिंपरी-पुणे,४११०१८ तसेच संत तुकारामनगर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मार्केट इमारत, तिसरा मजला, पिंपरी, ४११०१८ या पत्यावर पाठवावे. असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# सायकलमुळे अलोकची शिक्षणाची वाट होणार सुकर!

## सोशल हॅन्ड फाउंडेशन व सामाजिक कार्यकर्त्या मंजुश्री राजपूततर्फे गरजू विद्यार्थ्यांना सायकली प्रदान

।पिंपरी-चिंचवड।
।महाईन्यूज।प्रतिनिधी।



समाजातील काही विद्यार्थी आर्थिक परिस्थितीअभावी स्वत:ची सायकल घेऊ शकत नाहीत. तसेच वाहतुकीच्या साधनांअभावी रोज पंचवीस ते तीस किलोमीटरची पायपीट करत शिक्षणाची वाट धरत आहेत. अशाच गरजू अलोक गोडसे व अरव गोडसे या विद्यार्थ्यांची शिक्षणाची बिकट वाट सुकर करण्यासाठी सोशल हॅन्ड फाउंडेशन तर्फे दोन सायकली प्रदान करण्यात आल्या.

रोज पंचवीस ते तीस किलोमीटरची करून शाळेत जाणाऱ्या आणि अनेकांची प्रेरणा ठरलेल्या अलोक गोडसे याला निगडी मधील ओझर्डे रॅडिकल इन्स्टिट्यूट मध्ये पार पडलेल्या कार्यक्रमात सोशल हॅन्ड फाउंडेशन तर्फे सायकल भेट देण्यात आली. तसेच सामाजिक कार्यकर्त्या मंजुश्री राजपूत यांच्याकडून आलोकचा लहान भाऊ अरवला सायकल भेट देण्यात आली. प्रा.भूषण ओझर्डे यांनी आलोकची पुढील कोचिंग क्लासेसची जबाबदारी ओझर्डे इन्स्टिट्यूट स्वीकारणार असल्याचे आश्वासन दिले.

यावेळी जिल्हा परिषदेचे अकाउंट ऑफिसर जी. बी. गायकवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक हर्षल कामराज, सोशल हॅन्ड फाउंडेशनचे मदन दळे, प्रा. भूषण ओझर्डे, सचिन अडागळे, डॉ शीतल महाजन, चांगदेव कडलक आणि विलास मोहिते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयश्री ओझर्डे यांनी केले. दिपाली ओझर्डे यांनी आभार व्यक्त केले.

### विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरून आनंद ओसंडून वाहू लागला...

**या विद्यार्थ्यांनी आपली ओझर्डे रॅडिकल इंस्टीट्यूट ऑफ एज्युकेशन चे संचालक प्रा.भूषण ओझर्डे यांना सांगितली. आलोकची शाळा प्राधिकरणातील गुरुगणेश विद्या मंदिरत असून, विद्यार्थ्यांना पंचवीस ते तीस किलोमीटर पायी चालत येऊन शिक्षण घ्यावे लागत होते. कोणत्याही वाहनांची सुविधा नसल्यामुळे विद्यार्थ्यांचा बराच वेळ जाण्या-येण्यातच वाया जात होता, त्यासाठी या विद्यार्थ्यांना सोशल हॅन्ड फाउंडेशन व सामाजिक कार्यकर्त्या मंजुश्री राजपूत यांच्यामार्फत सायकलींची मदत मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरून आनंद ओसंडून जात होता.**

# वसतिगृहासाठी विद्यार्थ्यांचे आंदोलन!

## पुणे विद्यापीठात बायोमेट्रिक हजेरी सुरु केल्यानंतर विद्यार्थ्यांची भूमिका

पुणे
।महाईन्यूज।प्रतिनिधी।

वसतिगृहाच्या मागणीसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी सोमवारी रात्री मुख्य प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन केले. विद्यापीठ प्रशासनाने बायोमेट्रिक हजेरी सुरु केल्यानंतर विद्यार्थ्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.

मागेल त्याला हॉस्टेलची सुविधा देण्याचे आश्वासन विद्यापीठ प्रशासनाने दिले होते. सर्व कागदपत्रांची पूर्तता करूनही वसतिगृह कार्यालय गेस्ट सिस्टम



लागू करत नाही. विद्यापीठात प्रवेश घेऊनही या वर्षी विद्यार्थ्यांना वसतिगृह का मिळत नाही, असा प्रश्न विद्यार्थ्यांनी विद्यापीठ प्रशासनाला विचारला आहे. मुख्य प्रवेशद्वार अडवल्यामुळे आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांशी पोलीस प्रशासनाने संवाद साधत, रस्ता मोकळा करण्याची विनंती केली, पण विद्यार्थी आपल्या मागणीवर ठाम होते. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या विद्यापीठ शाखेचे उपाध्यक्ष महेश राहणे सांगतात,"गेल्या सहा महिन्यांपासून विद्यापीठ नियमितपणे चालू आहे. विद्यार्थी ग्रामीण भागातून वंचित, गरीब घरातल्या असल्यामुळे त्यांना पुण्यासारख्या महानगरात शिक्षण घेणे अशक्य आहे. म्हणून त्वरित जास्तीत जास्त मुलांना विद्यापीठाने शैक्षणिक सुविधा पासून दूर करू नये." वसतिगृहातील गेस्ट सिस्टम आणि वसतिगृह क्रमांक सहा सुरु करून तातडीने सर्व विद्यार्थ्यांना सामावून घ्यावे अशी मागणी विद्यार्थ्यांनी यावेळी केली. रात्री उशिरा पर्यंत विद्यार्थ्यांचे आंदोलन चालू होते. यासंबंधी विद्यापीठ प्रशासनाशी रात्री उशिरा पर्यंत संपर्काचा प्रयत्न केला. परंतु, कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.

# 'पुणे बंद'च्या पार्श्वभूमिवर पोलिसांचा कडक बंदोबस्त!

पुणे
।महाईन्यूज।प्रतिनिधी।

राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधान केल्याप्रकरणी मंगळवारी (ता.13) विविध राजकीय पक्ष, संघटनांकडून "पुणे बंद"ची हाक देण्यात आली आहे.

यादरम्यान शहरात कोणत्याही स्वरुपाची अनुचित घटना घडू नये, यासाठी पुणे पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवला आहे. विविध राजकीय पक्ष संघटना, पक्षांकडून पुकारलेल्या या बंदमध्ये अनेक सामाजिक, स्वयंसेवी संघटनाही सहभागी होणार आहे.

हा मोर्चा शहराच्या मध्यवर्ती भागातुन जाणार असल्याने पोलिसांनी सुमारे साडे सात हजार पोलिसांचा बंदोबस्त ठेवला आहे. शहर पोलिस दल, राज्य राखीव पोलिस दलाच्या तुकड्या, गृहरक्षक दलाचे जवान यांच्यासह स्थानिक पोलिस ठाणे, गुन्हे शाखेची पथकांचा बंदोबस्त या मोर्चाच्यावेळी आहे.

वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांचे या मोर्चावर लक्ष आहे. याबरोबरच कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, याचीही पोलिसांकडून दक्षता घेण्यात आली आहे.



**यादरम्यान शहरात कोणत्याही स्वरुपाची अनुचित घटना घडू नये, यासाठी पुणे पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवला आहे. विविध राजकीय पक्ष संघटना, पक्षांकडून पुकारलेल्या या बंदमध्ये अनेक सामाजिक, स्वयंसेवी संघटनाही सहभागी होणार आहे.**

# चंद्रकांत पाटील यांनी मागितली पुन्हा एकदा माफी

पुणे
।महाईन्यूज।प्रतिनिधी।

महापुरुषांच्या महान कार्याविषयी मला मनापासून आदर आहे. त्यांच्याविषयी बोलताना माझ्याकडून बोली भाषेतील शब्द अनवधानाने निघाले, यात मला कोणालाही दुखवायचा हेतू नव्हता. त्या शब्दाबद्दल मी दिलगिरी व्यक्त केलीच आहे. आता पुन्हा एकदा माफी मागतो. शाई फेक झाल्यानंतर घडलेल्या घटनांबाबत माझी कोणाबद्दलही तक्रार नाही. या मुद्यावरून महाराष्ट्र अशांत होऊ नये असे वाटते, त्यामुळे आता हा वाद थांबवावा असे आवाहन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी निवेदनाद्वारे केले आहे.

चंद्रकांत पाटील यांनी महापुरुषांबद्दल केलेल्या वक्तव्याने वाद निर्माण झाला आहे. त्यामुळे त्यांच्यावर शाईफेक करण्यात आली. याप्रकरणात काही जणांना अटक करण्यात आली आहे. हा वाद वाढत असल्याने पाटील यांनी याबाबत सविस्तर स्पष्टीकरण दिले. आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पवित्र स्मृतीस आणि त्यांच्या अनुकरणीय कृतीस मी सदैव वंदन करत आलो आहे. माझ्या कृतीत त्यांचे अनुकरण करत आलो असून, त्यांच्या कार्याविषयी आदर आहे. त्यांच्याविषयी बोलताना माझ्याकडून बोली भाषेतील शब्द अनवधानाने निघाले, यात मला कोणालाही दुखवायचा हेतू नव्हता.

# रिक्षा आंदोलन चिघळण्याच्या मार्गावर

हडपसर ।
।महाईन्यूज।प्रतिनिधी।



पुण्यातील रिक्षाचालकांनी आज पुन्हा एकदा बंदची हाक दिली. त्यामुळे पुणेकरांचे आज भलते हाल झाले. काही दिवसांपूर्वी देखील पुण्यातील रिक्षाचालकांनी आक्रमक धोरण अवलंबून काही करुन सरकारनं आपल्या मागण्या पूर्ण करावयात म्हणून एल्गार पुकारला होता.

बाईक टॅक्सी आणि अनधिकृत वाहतुकीच्या विरोधात सकाळी ११ वाजल्यापासून रिक्षा चालकांनी आरटीओ कार्यालयासमोर आंदोलन केलं. संचेती हॉस्पिटलपासून पुणे रेल्वे स्टेशनकडे जाणारा रस्ता देखील बंद होता.

जुना बाजार चौकतून आरटीओ कार्यालयाकडे जाणारा रस्ता आणि जहांगीर हॉस्पिटल चौकापासून संचेती हॉस्पिटलकडे जाणारा रस्ता बंद झाल्यानं मोठी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती.

## दंगल नियंत्रक पथक दाखल

हे आंदोलन आणखी चिघळण्याची शक्यता असल्याने पोलिस प्रशासनाने स्पेशल पोलिस फोर्स बोलावलं आहे. यामध्ये दंगल नियंत्रक पथकालाही पाचारण करण्यात आलेलं आहे. पोलिस आंदोलकांना वारंवार समजवण्याचा प्रयत्न करीत आहेत. मात्र आंदोलक आपल्या भूमिकेवर ठाम आहेत.

दरम्यान, आज दुपारी रिक्षा चालक रिक्षा रस्त्यावर सोडून घरी निघून गेल्याने आणखी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. रिक्षाचालक हे अजूनही त्यांच्या भूमिकेवर ठाम असल्याचे दिसून येत आहे. सध्या स्वतः पोलिस रस्त्यावरील रिक्षा बाजूला नेत वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

स्वच्छ सर्वेक्षण 2023 : देशात पिंपरी-चिंचवड शहर अव्वल स्थानावर येण्यासाठी महापालिकेच्या वतीने उपक्रम

# महापालिका कर्मचाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण!

## अधिकारी, कर्मचारी व विभाग यांच्या कामकाजाचे स्वरूप व जबाबदारी निश्चित

**पिंपरी-चिंचवड । ।महाईन्यूज ।**



**स्वच्छ सर्वेक्षण २०२३च्या अनुषंगाने महापालिकेच्यावतीने सफाई कर्माचाऱ्यांसाठी पिंपरी येथील आचार्य अत्रे रंगमंदिरात क आणि ग क्षेत्रीय कार्यालयातील सफाई कर्मचा-यांचे प्रशिक्षण आज आयोजित करण्यात आले होते. स्वच्छ सर्वेक्षण २०२३ मध्ये पिंपरी चिंचवड शहर देशात अव्वल स्थानावर येण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने महापालिकेच्या संबंधित अधिकारी, कर्मचारी व विभाग यांच्या कामकाजाचे स्वरुप व जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने सफाई कर्मचाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.**

यावेळी क्षेत्रीय अधिकारी अण्णा बोदडे, शीतल वाकडे, स्वच्छ भारत अभियानाचे समन्वयक विनोद जळक, प्रसिध्द वक्ते अशोक देशमुख, पतंजली योग समितीचे डॉ. अनिल जगताप, सहायक आरोग्याधिकारी कुंडलिक दरवडे, तानाजी दाते, मुख्य आरोग्य निरीक्षक वसंत सरोदे, आरोग्य निरीक्षक वैभव घोळवे, क्षितीज रोकडे, सतीश इंगेवाड, उमेश कांबळे, कॅम फाउंडेशनचे शाम राठोड, प्रसन्न येवलकर, डिव्हाईन या माध्यम संस्थेचे प्रतिनिधी तसेच सफाई कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नोव्हेंबर २०२२ मध्ये सर्वोत्तम कामगिरी करणा-या क आणि ग कार्यालयांच्या अधिनस्त असलेल्या सफाई कर्मचाऱ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सफाई कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी मोफत रोजगारभिमुख शिक्षण आणि कोर्सेसबद्दल सिंबायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या प्रीती शिंदे यांनी यावेळी माहिती दिली. "अर्बन आउटकम्स फ्रेमवर्क २०२२" या उपक्रमांतर्गत शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सिटीझन परसेप्शन सर्वेक्षण करण्यात येत असून याबाबतची माहिती स्मार्ट सिटी लिमिटेडच्या प्रतिनिधींनी यावेळी दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वच्छ भारत अभियानाचे समन्वयक विनोद जळक यांनी केले तर सूत्रसंचालन पौर्णिमा भोर यांनी केले.

### तणावमुक्त काम आवश्यक

**प्रसिध्द वक्ते अशोक देशमुख यांनी हास्य विनोदांद्वारे उपस्थित सफाई कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, काम करत असताना तणावमुक्त असणे खूप गरजेचे आहे. त्यामुळे कामावर १०० टक्के लक्ष केंद्रित होते व हाती घेतलेले काम यशस्वीरित्या पूर्ण होण्यास मदत होते. हास्य हा देखील एक उत्तम व्यायाम असून तो केल्यास आयुष्याकडे आपला पाहण्याचा दृष्टीकोन सकारात्मक होतो असे देखील त्यांनी सांगितले.**

### योगा आणि प्राणायाम केल्याने अनेक आजार टाळता येऊ शकतात

**डॉ. अनिल जगताप यांनी योगा विषयक मार्गदर्शन केले. सफाईचे काम करत असताना अनेक आरोग्यविषयक समस्या निर्माण होण्याची शक्यता असते. योगा आणि प्राणायाम केल्याने अनेक आजार टाळता येऊ शकतात किंवा त्यावर मात करता येऊ शकते याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. १०० वर्षे आयुष्य जगण्यासाठी प्रत्येक क्षण १०० टक्के जगता आला पाहिजे, असे देखील त्यांनी यावेळी नमूद केले. तसेच त्यांनी यावेळी अनेक योगमुद्रांची प्रात्यक्षिके करून दाखवली.**

# पिंपरीत रिक्षा संपाचा फज्जा उडाला : बाबा कांबळे

## पुणे पिंपरी चिंचवड शहरात सर्व रिक्षा व्यवस्था सुरळीत सुरु

**पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



**पिंपरी चिंचवड शहरात बोगस रिक्षा संघटनांच्या वतीने पुकारण्यात आलेल्या रिक्षा बंदचा फज्जा उडाला आहे. शहरात सर्वत्र रिक्षा सेवा सुरळीत सुरू असून नागरिकांची होणारी गैरसोय टळली आहे. महाराष्ट्र रिक्षा पंचायतीने यामध्ये सहभाग घेतला नव्हता. त्यामुळे बोगस संघटनांचे रिक्षा बंद आंदोलन यशस्वी झाले नसल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र रिक्षा पंचायतचे अध्यक्ष बाबा कांबळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले.**

प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे की, महाराष्ट्र रिक्षा पंचायतसह राज्याच्या समितीने आंदोलन केल्याने ओला उबेर ऍप्लिकेशन मधून टू व्हीलर विभाग रद्द करण्यात आले आहे. त्याबाबत प्रशासन युद्ध पातळीवर काम करत आहे. पुणे प्रशासनाने केलेल्या कामाचे अभिनंदन करण्यात आले. महाराष्ट्र रिक्षा पंचायत ऑटो रिक्षा चालक मालक संघटना संयुक्त संयुक्तकृती समिती व सोबत असलेल्या सर्व संघटनेचा हा विजय आहे. संघटनेच्या सातत्याने लढाईमुळे लवकरच रॅपिडो मधून देखील रद्द होणार असे आश्वासन प्रशासनाच्या वतीने देण्यात आले असल्याचे बाबा कांबळे म्हणाले.

पुणे जिल्ह्यातील काही बोगस संघटनांनी एकत्र येत रिक्षा बंद आंदोलन पुकारले होते. पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी रिक्षा बंद मध्ये सहभागी न होण्याचे आवाहन केले होते. त्याला सकारात्मक प्रतिसाद देत महाराष्ट्र रिक्षा पंचायत व अन्य सहकारी संघटनांनी आंदोलन न करण्याचा निर्णय घेतला. यामुळे आंदोलनाचा फज्जा उडाला आहे. केवळ शहरात काही ठिकाणी जमून विरोध करण्याचा प्रयत्न केला. मात्र अपयशी ठरला आहे.

रिक्षा चालक मालकांच्या विविध मागण्या शासन स्तरावरून मंजूर करून आणायचे असेल तर धमक लागते. ती धमक रिक्षा पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांमध्ये आहे. अनेक आंदोलन मार्गी लावुन न्याय मिळवून दिला आहे. शासनाच्या आव्हानाला सकारात्मक प्रतिसाद दिला असेल तरी 18 तारखेपर्यंत वाट पाहणार आहोत. रिक्षा चालकांचे प्रश्न न सोडविल्यास 19 तारखेला देशभर एकाच वेळी आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा बाबा कांबळे यांनी दिला.

**महाराष्ट्र रिक्षा पंचायतसह राज्याच्या समितीने आंदोलन केल्याने ओला उबेर ऍप्लिकेशन मधून टू व्हीलर विभाग रद्द करण्यात आले आहे. त्याबाबत प्रशासन युद्ध पातळीवर काम करत आहे. पुणे प्रशासनाने केलेल्या कामाचे अभिनंदन करण्यात आले. महाराष्ट्र रिक्षा पंचायत ऑटो रिक्षा चालक मालक संघटना संयुक्त संयुक्तकृती समिती व सोबत असलेल्या सर्व संघटनेचा हा विजय आहे. संघटनेच्या सातत्याने लढाईमुळे लवकरच रॅपिडो मधून देखील रद्द होणार असे आश्वासन प्रशासनाच्या वतीने देण्यात आले असल्याचे बाबा कांबळे म्हणाले.**

## संपादकीय

# तेलाचा तळतळाट!

***रशियाकडील तेलाच्या खरेदीवरील बंदीपेक्षा दरनियंत्रण लादण्याचा 'जी ७' समूहाने योजलेला उपाय प्रभावी ठरेल आणि भारतासही लाभाचाच!***

युक्रेन युद्धात रशियास काही प्रमाणात आणि कदाचित तात्पुरतीही माघार घ्यायला लागल्याने पाश्चात्य देशांस चांगलाच हुरूप आलेला दिसतो. तसे होणे तसे रास्तच. रशियाच्या या माघारीमागे अमेरिकेने पुरवलेल्या हत्यारांचा वाटा मोठा. यामुळेही असेल पण अमेरिका आणि त्याचे कच्छपि देश रशियाविरोधात आणखी एक अस्त्र उगारू इच्छितात. ते म्हणजे तेलास्त्र! हे आता दुसऱ्यांदा उगारले जाईल. आधी जगाने रशियन तेलावर बहिष्कार घालावा यासाठी प्रयत्न झाले. ते जमले नाही. खुद्द युरोपनेच तसे करण्यास नकार दिला. कारण युरोपातील अनेक देशांतील चुली रशियन ऊर्जास्रोतांवर पेटतात. तेव्हा रशियन इंधनास नाही म्हणणे युरोपियनांस शक्य नाही. त्यामुळे अमेरिकादी देशांनी तेलास्त्राचा दुसरा भाग पुढे केलेला दिसतो. तो म्हणजे रशियन तेलाच्या किमतींवर नियंत्रण. पहिल्या तेलास्त्रापेक्षा हे दुसरे अस्त्र अधिक प्रभावी ठरण्याची शक्यता दिसते. याचे कारण यामागे 'जी ७' नावाने ओळखला जाणारा बलाढ्य देश समूह असून त्यास संघटनेच्या पातळीवर युरोपचीही मान्यता आहे. म्हणजे अमेरिका, जपान, जर्मनी, ब्रिटन, फ्रान्स, इटली, कॅनडा आणि युरोपीय संघटना या दुसऱ्या तेलास्त्रामागे असून हे अस्त्र कधी, कसे आणि किती काळ उगारावे याची चर्चा सध्या सुरू आहे. पहिल्या अस्त्रात रशियाकडून होणारी तेलखरेदी सरसकट बंद करणे अनुस्यूत होते. दुसरे अस्त्र रशियावर किमतीचे नियंत्रण घालते. म्हणजे निर्धारित किमतीपेक्षा अधिक दर घेऊन रशिया तेल विकू शकणार नाही. यामागील विचार असा की किंमत नियंत्रण घातल्याने रशियाचे तेल बाजारात येत राहील, तेलटंचाई होणार नाही आणि तरीही नफेखोरी करता न आल्याने तेल विकून रशियाच्या तिजोरीत फार काही पैसा जमा होणार नाही. या अस्त्राच्या बिनचूकपणासाठी वाहतूक, विमा आदी क्षेत्रे यात सहभागी होतील. ही झाली हे तेलास्त्र उगारणाऱ्यांची पार्श्वभूमी. आता हे अस्त्र ज्यावर उगारले जाणार आहे त्या रशियाविषयी. हा देश आज जगातील दुसऱ्या क्रमांकाचा तेल उत्पादक. म्हटल्यास सौदी अरेबिया किंवा अमेरिका यांच्याशी स्पर्धा करू शकेल इतके महाकाय तेलसाठे रशियात आहेत. पण तरीही सौदी अरेबिया वा व्हेनेझुएला आदींप्रमाणे रशिया तेल निर्यातदार देशांच्या संघटनेचा सदस्य नाही. प्रतिदिन जगात वापरल्या जाणाऱ्या तेलातील १०-११ टक्के इतका वाटा रशियाच्या तेलाचा असतो. दररोज दहा कोटी बॅरल्स जगात रिचवले जात असेल तर त्यातील एक कोटभर बॅरल्स रशियातील असतात. तथापि युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून इतके तेल विकणे रशियास शक्य झालेले नाही. त्यात कपात होऊन साधारण ७० लाख बॅरल्स इतके तेल रशिया आंतरराष्ट्रीय बाजारात विकतो. या तेलविक्रीतून रशियाच्या तिजोरीत दर महिन्याला सरासरी सुमारे २००० कोटी डॉलर्स इतके उत्पन्न मिळते.

# मंदीमुळे उत्पन्न घटण्याची आणि गरिबीत वाढ होण्याची भीती,







दीड दशकात जग तिसऱ्यांदा मंदीकडे जात आहे का? आजच्या इंग्लंडची स्थिती या प्रश्नाचे उत्तर आहे. ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात डेन्मार्कची गुंतवणूक बँक, सॅक्सो बँकेचे विश्लेषक ख्रिस्तोफर डेंबिक यांनी सांगितले की, इंग्लंडची स्थिती विकसनशील देशासारखी झाली आहे. डेम्बिकच्या मते, "इंग्लंडला विकसनशील देशांत येण्यापासून रोखणारा एकच उपाय शिल्लक आहे आणि ते म्हणजे त्याचे चलन, पौंड. अशांत आर्थिक स्थिती असूनही पाउंड मजबूत आहे. पण गेल्या सोमवारी तो मापही मोडला गेला आणि डॉलरच्या तुलनेत पौंड विक्रमी नीचांकी पातळीवर पोहोचला. डेम्बिककडून कोणतेही नवीन विधान नाही, परंतु आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदार एकेकाळी सुरक्षित मानले जाणारे ब्रिटिश पाउंड विकून यूएस डॉलर खरेदी करत आहेत.

ज्या ब्रिटीश साम्राज्याचा सूर्य कधीच मावळत नाही, त्याचे हे आजचे वास्तव आहे. बँक ऑफ इंग्लंडने म्हटले आहे की डिसेंबर तिमाहीत देश मंदीमध्ये प्रवेश करेल. त्यात 2025 पर्यंत नकारात्मक विकास दर म्हणजेच मंदीचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. केवळ इंग्लंडच नाही तर युरोपातील अनेक देशांची अर्थव्यवस्था ढासळत चालली आहे. आधी कोरोनाचे संकट, नंतर रशिया-युक्रेन युद्ध आणि आता या दोन्हींमुळे विक्रमी महागाईने जग पुन्हा एकदा मंदीच्या उंबरठ्यावर आले आहे.

2008-09 च्या आर्थिक संकटानंतर असे म्हटले जात होते की, असे संकट आयुष्यात एकदाच येते. पण त्यानंतर कोरोना लॉकडाऊनमुळे निर्माण झालेले आर्थिक संकट आणि आता युद्ध... हे पहिल्यांदाच घडले आहे. म्हणूनच वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने बुधवारी 'चीफ इकॉनॉमिस्ट्स आउटलुक' या ओळींसह प्रसिद्ध केले, "नवीन पिढी प्रथमच इतकी जास्त महागाई पाहत आहे. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी अमेरिकेसह अनेक देश व्याजदर वाढवत आहेत, त्यामुळे जागतिक विकासाला धोका निर्माण झाला आहे. लोकांचे खरे उत्पन्न आणि ग्राहकांचा विश्वास सतत कमी होत आहे. अशा परिस्थितीत बेरोजगारी आणि सामाजिक अशांतता वाढू शकते.

बहुतेक तज्ञ मंदीची शक्यता योग्य मानतात. नेड डेव्हिस रिसर्च (NDR) ने मध्यवर्ती बँकांनी व्याजदर वाढवल्यामुळे आणि रशिया-युक्रेन युद्धामुळे पुढील वर्षी मंदीचा अंदाज 98.1% आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने जगातील शीर्ष 49 संस्थांच्या मुख्य अर्थशास्त्रज्ञांचे सर्वेक्षण केले, ज्यामध्ये केवळ 14% ने सांगितले की मंदीचा कोणताही धोका नाही. 9% लोकांना याची खूप भीती वाटली आणि 64% लोकांनी खूप सांगितले. यूएससाठी 70% आणि युरोपसाठी 80% अर्थशास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे की पुढील एका वर्षात व्याजदर वाढतील, त्यामुळे मंदीचा धोका जास्त आहे.

खरंच, अमेरिका आणि युरोप विक्रमी महागाईशी झुंज देत आहेत. अमेरिकेतील किरकोळ चलनवाढीचा दर या वर्षीच्या जानेवारीपासून सातत्याने ७.५% वर राहिला आहे. जूनमध्ये ते 9.1% पर्यंत पोहोचले, जे 1981 नंतरचे सर्वोच्च आहे. ऑगस्टमध्ये तो 8.3 टक्के होता. युरोझोनमधील महागाई ऑगस्टमध्ये विक्रमी 9.1% वर पोहोचली आहे. ते खाली आणण्यासाठी, यूएस फेडरल रिझर्व्हने 17 मार्च ते 21 सप्टेंबर या कालावधीत पाच वेळा व्याज 3% वाढवले आहे. गेल्या तीन वेळा, प्रत्येक वेळी त्यात 0.75% वाढ झाली. युरोपियन सेंट्रल बँकेने गेल्या महिन्यात 19-राष्ट्रीय गट युरो झोनसाठी व्याजदर 0.75% ने वाढवले आहेत. यापूर्वी जुलैमध्ये त्यात 0.5% वाढ झाली होती. इंग्लंड युरो झोनच्या बाहेर आहे, जेथे ऑक्टोबरमध्ये चलनवाढ 13% ओलांडण्याची अपेक्षा आहे. नैसर्गिक वायूच्या किमती गगनाला भिडण्यापासून सामान्य लोकांचे आणि उद्योगांचे संरक्षण करण्यासाठी, इंग्लंडने किंमत मर्यादा निश्चित केली आहे. ऑक्टोबरमध्ये ही मर्यादा 70% पर्यंत वाढवण्याची अपेक्षा आहे. त्यानंतर महागाईही सातव्या गगनाला भिडणार आहे. कमी-अधिक प्रमाणात हीच परिस्थिती इतर युरोपीय देशांची आहे.

# रिअल इस्टेटला बूम

**देशात सर्वाधिक रोजगारनिर्मिती करणाऱ्या क्षेत्रांमध्ये बांधकाम क्षेत्राचा समावेश होतो. यंदा जानेवारी ते जून या कालावधीत देशातील प्रमुख आठ शहरांतील सदनिकांची विक्री गेल्या वर्षीच्या तुलनेत ६० टक्क्यांनी वाढली आहे.**

सध्याची सदनिकांची वाढती मागणी पाहता चालू वर्षी आणि पुढील वर्षीही बांधकाम क्षेत्रासाठी सकारात्मक राहणार आहे. देशपातळीवर विविध संस्थांनी जाहीर केलेल्या अहवालातील आकडेवारीनुसार या दाव्याला बळकटी मिळाली आहे. सदनिका खरेदी विक्रीमधील वाढ गेल्या नऊ वर्षांतील सर्वाधिक वाढ असल्याचाबांधकाम व्यावसायिकांचा दावा आहे.

करोनाच्या दोन वर्षांच्या काळात स्थावर मालमत्ता क्षेत्रात व्यवहार मंदावले होते. मात्र जानेवारी ते जून २०२२ या कालावधीत देशात सदनिकांच्या विक्रीचे प्रमाण ६० टक्क्यांनी वाढले आहे. देशातील प्रमुख आठ शहरांमध्ये मिळून १ लाख ५८ हजार ७०५ सदनिकांची विक्री झाली, तर २०२१ मध्ये पहिल्या सहा महिन्यांत ९९ हजार ४१६ सदनिकांची विक्री झाली होती. गेल्या वर्षीच्या तुलनेत सदनिका विक्रीतील ही वाढ गेल्या ९ वर्षांतील सर्वाधिक आहे.



मुंबई, दिल्ली, बेंगळूरु, चेन्नई, पुणे, अहमदाबाद, हैदराबाद आणि कोलकाता या आठ शहरांतील सदनिका विक्रीची आकडेवारी पाहता ही वाढ निदर्शनास येते. देशात सर्वाधिक ४४ हजार २०० सदनिकांची विक्री मुंबईत झाली. त्या खालोखाल दिल्लीत २९ हजार १०१ आणि बेंगळूरुमध्ये २६ हजार ६७७ सदनिका विकल्या गेल्या. तर पुण्यात २१ हजार ७९७ सदनिकांची विक्री झाली. त्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत सदनिकांच्या विक्रीचे प्रमाण मुंबईत ५५ टक्के आणि पुण्यात २५ टक्के वाढले आहे. प्रमुख आठ शहरांतील सदनिका विक्रीपैकी २८ टक्के सदनिकांची विक्री एकट्या मुंबईत झाली. देशभरात नवे गृहप्रकल्प सादर करण्याचे प्रमाणही गेल्या वर्षीच्या तुलनेत ५६ टक्क्यांनी वाढले. नवे गृहप्रकल्प सादर करण्याचे प्रमाण मुंबई ३२ टक्क्यांनी वाढले, तर पुण्यात नवीन गृहप्रकल्प सादरीकरणात १५ टक्क्यांनी घट झाली. देशभरातील प्रमुख आठ शहरांमध्ये सदनिकांच्या किमती सरासरी ३ ते ९ टक्क्यांनी वाढल्या. त्यात मुंबईत ६ टक्के, बेंगळूरुमध्ये ९ टक्के आणि दिल्लीमध्ये ७ टक्के वाढ झाली. तर पुण्यात ६ टक्के वाढ झाली. २०१५ पासून पहिल्यांदाच देशभरातील सदनिकांच्या किमतीमध्ये वाढ झाली आहे मात्र त्यानंतरही राज्यभरात सदनिका खरेदी विक्रीला गती मिळाली असल्याची वस्तुस्थिती आहे. करोना प्रादुर्भावाच्या आधी रेरा कायदा, वस्तू आणि सेवा कराची अंमलबजावणी यामुळे बांधकाम क्षेत्रात आणि ग्राहकांमध्येही गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती.

## ।। अभंगवाणी ।।



बोलायाचा त्यासीं ।
नको संबंध मानसीं ॥१॥
जया घडली संतनिंदा ।
तुज विसरूनि गोविंदा ॥धृ.॥
**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# "सवंग प्रसिद्धीसाठी काहीही करू नका"

## शाईप्रकरणी राज ठाकरेंनी घेतली चंद्रकांत पाटलांची बाजू

। मुंबई । महाईन्यूज ।

कर्मवीर भाऊराव पाटील, महात्मा जोतीबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल भाजपा नेते आणि राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केलेल्या वक्तव्याचे पडसाद राज्यभरात उमटले आहेत. या पार्श्वभूमीवर चंद्रकांत पाटील यांनी, या वादावर मी पडदा टाकत आहे, सर्वांनी तो थांबवावा, असे आवाहन केले आहे. दरम्यान, या सर्व प्रकरणात राज ठाकरे यांनी चंद्रकांत पाटलांची बाजू घेतली असून शाईफेक करण्याऱ्यांविरोधात नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी नुकतंच सोशल मीडियावर याबाबत एक निवेदन जाहीर केले आहे.

एखाद्याच्या जीवावर बेतेल अशा पद्धतीने निषेध नोंदवणं हे साफ बिनडोपणाचं आहे, आणि माझ्या मते हा निषेध नाही तर तो स्टंट असतो. याची जाणीव मी त्या प्रतिनिधींना करून दिली. पण असो निषेधकर्त्यांच्या वतीने या सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी मला विनंती केली की मी या प्रकरणात मध्यस्थी करावी, कारण ही कलमं कायम राहिली तर या कार्यकर्त्यांचं आयुष्य उद्ध्वस्त



होईल, असं राज ठाकरेंनी आपल्या पत्रात म्हटलं आहे.

चंद्रकांत पाटलांना फोन करून राज ठाकरेंनी याप्रकरणात मध्यस्थीची भूमिका घेतली आहे. चंद्रकांत पाटलांसोबत फोनवर झालेल्या संभाषणाबाबतही त्यांनी आपल्या पोस्टमध्ये सांगितलं. मी स्वतः चंद्रकांत दादांशी बोललो. त्यांच्या कानावर या सगळ्यांचं म्हणणं घातलं. त्यावर त्यांनी माझ्या विनंतीचा मान ठेवत ३०७ सारखं कलम शिथिल करण्याची तयारी दाखवली. तसंच, माझं उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी देखील बोलणं झालं. पोलिसांवरचं निलंबन मागे घेऊन, त्यांना पुन्हा सेवेत घ्यावं अशी विनंती मी त्यांना केली, ज्याला त्यांनी तात्काळ होकार दिला. यासाठी दोघांचे मनापासून आभार, असं राज ठाकरे म्हणाले.

**राज ठाकरे यांचं पत्र जशास तसं**

**सस्नेह जय महाराष्ट्र,**

लोकशाहीमध्ये एखादी गोष्ट चुकली तर निषेध व्हायलाच हवा, आम्ही पण 'मनसे स्टाईल'ने अनेकवेळा निषेध नोंदवतो. पण हे करताना काही संकेत असतात. सध्या महाराष्ट्रात महापुरुषांवरून विधानं करून माथी भडकवण्याचे उद्योग सुरू आहेत आणि त्या वादांमधून मतं मिळवण्याची केविलवाणी धडपड सुरू आहे. त्यामुळे एखादं विधान आलं की त्याचे संदर्भ न तपासता कार्यकर्त्यांना भडकवून, स्वतः नामानिराळं राहण्याचे प्रकार महाराष्ट्रात वाढायला लागलेत. मग ह्यांचे कार्यकर्ते पण कसलाच विचार न करता, कसलीही खातरजमा न करता, वाट्टेल त्या मार्गाने निषेध करत सुटतात.

असाच प्रकार, राज्यातील विद्यमान मंत्री, भाजपाचे राज्यातील ज्येष्ठ नेते आणि माझे मित्र श्री. चंद्रकांत पाटील ह्यांच्या बाबतीत घडला. एका कार्यक्रमात त्यांच्या चेहऱ्यावर शाई फेकण्यात आली. एकच बरं झालं, की चंद्रकांत दादांच्या डोळ्याला कोणतीही इजा झाली नाही. हे झाल्यावर पोलीस आयुक्तांनी तिथे हजर असलेल्या ११ पोलिसांचं निलंबन केलं आणि आरोपींवर भारतीय दंडसंहितेच्या अंतर्गत अनेक कलमांच्या जोडीला, कलम ३०७ देखील लावलं. हे कलम सदोष मनुष्यवधाचं कलम आहे. हे सगळं जेंव्हा मला कळलं तेंव्हा मला सर्वप्रथम हळहळ वाटली ती माझ्या पोलीस बांधवांबद्दल. पोलिसांना हा प्रकार रोखता आला नाही हे मान्य, पण तरीही त्यांच्यावरची कारवाई मला तरी अनाठायी वाटली आणि त्यामुळे मी अस्वस्थ होतो. त्यातच आज संध्याकाळी पिंपरी चिंचवड परिसरातील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी ह्या पक्षांचे प्रमुख पदाधिकारी आणि इतर काही नागरी संस्थांचे पदाधिकारी, मला भेटून गेले आणि त्यांनी पोलिसांनी दाखल केलेली कलमं ही गंभीर आहेत अशी तक्रार केली. मुळात एखाद्याच्या जीवावर बेतेल अशा पद्धतीने निषेध नोंदवणं हे साफ बिनडोकपणाचं आहे, आणि माझ्या मते हा निषेध नाही तर तो स्टंट असतो. ह्याची जाणीव मी त्या प्रतिनिधींना करून दिली. पण असो, निषेधकर्त्यांच्या वतीने ह्या सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी मला विनंती केली की, मी ह्या प्रकरणात मध्यस्थी करावी, कारण ही कलमं कायम राहिली तर ह्या कार्यकर्त्यांचं आयुष्य उध्वस्त होईल.

म्हणून मी स्वतः चंद्रकांत दादांशी बोललो, त्यांच्या कानावर ह्या सगळ्यांचं म्हणणं घातलं. त्यावर त्यांनी माझ्या विनंतीचा मान ठेवत ३०७ सारखं कलम शिथिल करण्याची तयारी दाखवली. तसंच माझं उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस ह्यांच्याशी देखील बोलणं झालं. पोलिसांवरचं निलंबन मागे घेऊन, त्यांना पुन्हा सेवेत घ्यावं अशी विनंती मी त्यांना केली, ज्याला त्यांनी तात्काळ होकार दिला. ह्यासाठी दोघांचे मनापासून आभार.

पण माझी महाराष्ट्रातील तमाम राजकीय कार्यकर्त्यांना विनंती आहे की, निषेध जरूर नोंदवा पण सवंग प्रसिद्धीसाठी असं काहीही करू नका, जे एखाद्याच्या जीवावर बेतेल. ह्या प्रकरणातून इतका धडा जरी सगळ्यांनी घेतला तरी पुरेसं आहे. महाराष्ट्राची राजकीय परंपरा सुसंस्कृत आहे, त्याचा दाखला आज ह्या दोन नेत्यांनी दाखवला, आता इतरांनी पण तो कृतीतून दाखवावा हीच अपेक्षा.

# "शिंदे गटाला वेळ देण्यासाठी निवडणूक आयोगानं तारीख पुढे ढकलली

## अरविंद सावंतांचा गंभीर आरोप

। मुंबई । महाईन्यूज ।

शिवसेनेचे ज्येष्ठ नेते एकनाथ शिंदे यांच्यासह ४० आमदारांनी बंडखोरी केल्यामुळे शिवसेना पक्षात फूट पडली आहे. त्यामुळे खरी शिवसेना कोणाची? हा प्रश्न अनेकांना पडला आहे. खरी शिवसेना आमचीच असून 'शिवसेना' हे नाव आणि 'धनुष्यबाण' निवडणूक चिन्ह आम्हालाच मिळावं, अशी मागणी दोन्ही गटाकडून केला जात आहे. हे प्रकरण आता केंद्रीय निवडणूक आयोगाकडे गेलं आहे.

खरी शिवसेना कुणाची? याबाबतची कागदपत्रे सादर करण्यासाठी निवडणूक आयोगाने २३ डिसेंबरपर्यंतचा कालावधी दिला होता. ठाकरे गटाकडून जवळपास २० लाख प्रतिज्ञापत्रे निवडणूक आयोगाकडे




जमा केली आहेत. शिंदे गटाकडून मात्र किती प्रतिज्ञापत्रे जमा केली आहेत, याबाबतची स्पष्टता नाहीये. एकंदरीत अशी स्थिती असताना निवडणूक आयागाने प्रतिज्ञापत्रे जमा करण्याची तारीख पुढे ढकलली आहे. निवडणूक आयोगाच्या या निर्णयावरून शिवसेना खासदार अरविंद सावंत यांनी टीका केली आहे. शिंदे गटाला आणखी वेळ मिळावा म्हणून निवडणूक आयोगाने ही तारीख पुढे ढकलली, असा आरोप अरविंद सावंत यांनी केला आहे. ते नवी दिल्ली येथे प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

निवडणूक आयोगाच्या निर्णयावर प्रतिक्रिया देताना अरविंद सावंत म्हणाले, "शिवसेनेच्या प्रतिज्ञापत्राची संख्या मोठी आहे. हा आकडा २० लाखांच्या आसपास आहे. पण निवडणूक आता आयोग पळवाट काढत आहे. निवडणूक आयोगाने २३ डिसेंबर शेवटची तारीख दिली होती. पण ही तारीख पुढे ढकलण्याचं कारण काय होतं? हे मला कळलं नाही. शिंदे गटाला वेळ देण्यासाठी हा निर्णय घेतला आहे. या संस्था बरबटल्या आहेत. महाराष्ट्रात असंवैधानिक सरकार बसलं आहे, त्याच्यावर अजूनही निर्णय दिला जात नाही. ही बाब गंभीर असून लोकशाहीसाठी धोकादायक आहे. केवळ निर्णय पुढे ढकलायचं काम सुरू आहे. कारण त्यांना नकार देता येत नाहीये आणि होकार कसा देणार? अशी अडचण निर्माण झाली आहे. हे सगळं राजकीयदृष्ट्या सुरू आहे. उद्दिष्ट आणि कर्तव्यापासून या संस्था भरकटल्या आहेत" अशी टीकाही अरविंद सावंतांनी केली.

# मुंबई विमानतळावर रेकॉर्डब्रेक गर्दी

## दोन दिवसांत दीड लाख प्रवाशी गेले परदेशी

। मुंबई । महाईन्यूज ।

मुंबई विमानतळावर आजही रेकॉर्डब्रेक गर्दी पहायला मिळाली. गेल्या दोन दिवसांत दीड लाख प्रवाशी परदेशात गेले आहेत. केवळ मुंबईतच नव्हे तर देशभरातील बहुतेक बड्या विमानतळांवर गर्दीची दृश्ये दिसत आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर विमानवाहतूक एरव्ही सुरळीत पार पडत असते पण यंदा हे चित्र काहीसं गर्दीचं झालं आहे. याची कारणं म्हणजे ख्रिसमस आणि इयर एन्डनिमित्त सध्या सुट्ट्यांचा हंगाम आहे. गेल्या दोन वर्षात कोरोनाच्या काळात लोकांना देशाबाहेर फिरस्ती करता आली नाही, म्हणून यंदा लोकांनी देशाबाहेर जाण्यास पसंती दिली आहे. या विमानतळावरुन रोज ८२२ विमानांची उड्डाण होतात. पण गेल्या गेल्या दोन दिवसात सुमारे दीड लाख प्रवाशांनी इथून प्रवास केला आहे. काही दिवसांपूर्वी केंद्रीय नागरी हवाई उड्डाण मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी देशातील गर्दीच्या विमानतळांचा आढावा घेत प्राधिकरणाला सूचना केल्या होत्या. दरम्यान, विमान प्राधिकरणानं सुचना केल्या होत्या की जर प्रवाशांना देशाबाहेर प्रवास करायचा असेल तर साडेतीन तास आधी विमानतळावर यावं लागेल. तसेच देशांतर्गत प्रवास करायचा असेल तर अडीच तास आधी यावं लागेल. यामागे सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर विमानतळांवर होत



## महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद

# अमित शाहांनी दोन्ही राज्यांची बोलावली बैठक!

## कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मईंची माहिती

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादावर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मध्यस्थी केल्याचे पाहायला मिळत आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादाप्रकरणी दोन्ही राज्यांची मंगळवारी अमित शाहांनी बैठक बोलवल्याची माहिती कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी दिली. त्यामुळे अमित शाह याप्रकरणी



काय निर्णय घेणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादावर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह मध्यस्थी करणार असल्याची माहिती याआधी राष्ट्रवादीचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनीही दिली होती.

महाविकास आघाडीच्या खासदारांनी कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांची अमित शाहांकडे तक्रार केली होती. याची गंभीर दखल अमित शाहांनी घेतल्याची माहिती डॉ. अमोल कोल्हे यांनी दिली. त्यानुसार, १४ डिसेंबरला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्यासोबत अमित शाह एकत्र चर्चा करणार असल्याचे कोल्हे यांनी सांगितले होते.

यावेळी त्यांनी महाराष्ट्र कर्नाटक सीमावादाचे प्रकरण सुप्रीम कोर्टात प्रलंबित असताना कर्नाटक सरकारने जी अरेरावीची भाषा केली आहे, अडेलतट्टूपणा सुरु केला आहे, त्याविषयी चर्चा केल्याचं अमोल कोल्हे यांनी सांगितलं.

दरम्यान, महाराष्ट्र कर्नाटक सीमावादावर राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी टीकास्त्र सोडले. "कर्नाटकचे मुख्यमंत्री अतिशय मस्तीत किंवा माज आल्यासारखे बोलत आहेत. काल त्यांनी कहर केला. सध्या महाराष्ट्र-कर्नाटक वाद पेटलेला असताना महाराष्ट्राच्या बाजूने कोणीच बोलत नाही आहे", अशा शब्दांत ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी कर्नाटकाचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्यावर हल्लाबोल केला. दिवसेंदिवस महाराष्ट्र-कर्नाटक वाद चिघळत आहे. महाराष्ट्राच्या वाहनांवर कर्नाटकात हल्ला करण्यात आला.

---

# भूपेंद्र पटेल दुसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदी

## गुजरातमध्ये १६ मंत्र्यांसह शपथविधी

**।अहमदाबाद । महाईन्यूज ।वृत्तसंस्था ।**

गुजरातच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ भूपेंद्र पटेल यांनी सोमवारी घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री व भाजपशासित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत हा शपथविधी सोहळा झाला. पटेल सलग दुसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळत आहेत. त्यांच्यासह अन्य १६ मंत्र्यांनीही शपथ घेतली. त्यापैकी आठ कॅबिनेट दर्जाचे आहेत. यात ११ माजी मंत्री नव्याने समाविष्ट करण्यात आले आहेत.

नवीन सचिवालयाजवळील हेलिपॅड मैदानावर आयोजित समारंभात राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी राज्याचे १८ वे मुख्यमंत्री म्हणून पटेल यांना शपथ दिली. कॅबिनेट मंत्र्यांमध्ये कनू देसाई, हृषीकेश पटेल, राघवजी पटेल, बलवंतसिंग राजपूत, कुंवरजी बावलिया, मुलुभाई बेरा, कुबेर डिंडोर आणि भानुबेन बावरिया यांचा समावेश आहे. हर्ष संघवी आणि जगदीश विश्वकर्मा यांनी राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार) म्हणून शपथ घेतली. इतर सहा राज्य मंत्र्यांमध्ये पुरुषोत्तम सोलंकी, बच्चूभाई खाबड, मुकेश पटेल, प्रफुल्ल पानशेरिया, भिखुसिंह परमार आणि कुवरजी हलपती यांचा समावेश आहे. या १६ मंत्र्यांपैकी चार (बावलिया, खाबड, सोलंकी आणि मुकेश पटेल) कोळी समाजातील, तीन (राघवजी, हृषीकेश आणि प्रफुल्ल) पाटीदार, तीन (विश्वकर्मा, परमार आणि बेरा) इतर मागासवर्गीय (ओबीसी) व दोन (हलपती व डिंडोर) आदिवासी समाजातील आहेत.



### शपथविधी कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांची उपस्थिती

**भूपेंद्र पटेल यांचा शपथविधी सोहळा 12 डिसेंबर रोजी पार पडणार आहे. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, भाजप अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यासह संसदीय मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते.**

### भाजपचा ऐतिहासिक विजय

**गुजरात विधानसभा निवडणुकीत भाजपने ऐतिहासिक विजय मिळवला. यंदाच्या निवडणुकीत भाजपने 156 जागांवर विजय मिळवला आहे. भाजपच्या या विजयाने काँग्रेसचा 37 वर्ष जुना विक्रमदेखील मोडीत निघाला. काँग्रेसने 1985 च्या निवडणुकीत 149 जागांवर विजय मिळवला होता.**

### काँग्रेसचं विरोधीपक्ष नेते पद नाही

**गुजरात विधानसभेच्या 182 जागा आहेत. विरोधीपक्ष पदासाठी कमीतकमी 10 टक्के जागा निवडून येणं अनिवार्य आहे. विरोधीपक्ष नेतेपदासाठी गुजरातमध्ये कमीतकमी 18 जागा हव्या आहेत. पण काँग्रेसला 17 जागा मिळाल्या आहेत. 2017 मध्ये झालेल्या गुजरात विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला 77 जागा मिळाल्या होत्या. पण या निवडणुकीत काँग्रेसची अवस्था अतिशय बिकट झाली आहे.**

---

## ठाकरे विरुद्ध शिंदे गट चिन्हाची लढाई

# आता थेट पुढील वर्षी होणार सुनावणी

**।नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

: केंद्रीय निवडणूक आयोगासमोर आजपासून शिंदे गट आणि ठाकरे गट यांच्यामध्ये धनुष्यबाण हे चिन्ह नेमकं कुणाचं, यासह अन्य मुद्द्यांवर सुनावणी झाली. मात्र आजची सुनावणी काही मिनिटेच चालली. तर यासंदर्भातील पुढील सुनावणी ही नवीन वर्षात जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात होणार असल्याचं, केंद्रीय निवडणूक आयोगाने सांगितल्याचं ठाकरे गटाचे नेते अनिल देसाई यांनी सांगितलं आहे.

याबाबत अधिक माहिती देताना अनिल देसाई (Anil Desai) म्हणाले आहेत की, धनुष्यबाण चिन्हासह इतर मुद्द्यावर जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सुनावणी होणार.



या मुद्द्यांवर आज युक्तिवाद होऊ शकला नाही. ते म्हणाले, आज फक्त 5 ते 7 मिनिटेच कामकाज झालं. आम्हाला अपेक्षित होत की, आम्ही ज्या गोष्टी सादर केल्या आहेत. जे मूळ दस्तावेज दिले आहेत, त्या दस्तावेजाची छाननी झाली पाहिजे होती. त्यात खरं काय, खोटं काय, हे दोन्ही बाजूचे तपासायला हवं होतं. त्यानंतर ते निवडणूक आयोगासमोर जाणार. परंतु जानेवारीच्या पहिल्या आठवड्याची तारीख दिल्याने आम्ही तयार आहोत, असं ते म्हणाले आहेत. ते पुढे म्हणाले, आमच्याकडे 3 लाख प्रतिज्ञापत्र पात्र आणि इतर प्राथमिक सदस्यांची नोंद आम्ही दिली आहे. यातच आतापर्यंत या दोन्ही गटाकडून काय दवे करण्यात आले आहे, हे जाणून घेऊ.

**ठाकरे गट**

राष्ट्रीय प्रतिनिधी : 160
संघटनात्मक : 2,82,975
ठाकरे गट प्राथमिक सदस्य : 19, 41, 815
एकूण सदस्य : 22, 24, 950

**शिंदे गट**

खासदार : 12
आमदार : 40
संघटनात्मक : 711
शिंदे गट स्थानिक स्वराज्य संस्था प्रतिनिधी : 2046
शिंदे गट प्राथमिक सदस्य : 4, 48, 318
एकूण : 4, 51,127

---

# गलवानची पुनरावृत्ती! तवांगमध्ये भारत-चीनचं सैन्य एकमेकांना भिडलं; 30 जखमी

**नवी दिल्ली :** गलवान खोऱ्यात झालेल्या भारत-चीन सैन्याच्या झटापटीच्या घटनेची पुनरावृत्ती झाली आहे. ९ डिसेंबर रोजी अरुणाचल प्रदेशातील तवांगमध्ये पुन्हा एकदा भारत-चीनचे सैनिक एकमेकांना भिडले आहेत. यामध्ये ३० जवान जखमी झाल्याचं सांगण्यात येत आहे. यावर भारताकडून आणि चीनकडून कुठलंही स्पष्टीकरण अद्याप आलेलं नाही.

एएनआयच्या वृत्तानुसार, ९ डिसेंबर २०२२ रोजी पिपल्स लिबरेश आर्मी (PLA) अर्थात चीनच्या सैन्याच्या ट्रूप्सची भारतीय सैन्यासोबत अरुणाचलच्या तवांग प्रांतात झटापट झाली. या झटापटीत दोन्ही बाजूंकडील सैनिक किरकोळ जखमी झाले आहेत. यानंतर दोन्ही बाजूंकडील सैन्यानं ताबडतोड संबंधित एरियातून माघार घेतली.

# 'देवों के देव महादेव'च्या पार्वतीचं लग्न....



टीव्ही वरील 'देवों के देव महादेव' या मालिकेतून पार्वतीच्या भूमिकेतुन घराघरात पोहचलेली सोनारिका भदोरिया ही लोकप्रिय आभिनेत्रीपैकी एक आहे. ती तिच्या बोल्ड फोटोशूटसाठीही ओळखली जाते. टीव्ही शोच्या माध्यमातून ती लाखो चाहत्यांच्या मनावर राज्य करत आहे. अलीकडेच सोनारिकाने उद्योगपती विकास पराशरसोबत तिच्या रोका समारंभातील फोटो पोस्ट केले. इंस्टाग्रामवर तिने याबाबत घोषणा करत चाहत्यांना आंनदाचा धक्का दिला आहे. तिने फोटो पोस्ट करत लिहिले , '3-12-2022 माझ्या संपूर्ण आयुष्यासाठी माझं संपूर्ण हृदय . मला आयुष्यभराची भेट मिळाली! याबद्दल मी सदैव कृतज्ञ राहिलं... हॅप्पी रोका लव्ह. यावेळी सोनारिकाने गुलाबी रंगाचा सीक्विन्ड को-ऑर्ड सेट परिधान केला होता. तर तिच्या जोडीदाराने पांढरा सूट घातला होता. इव्हेंटमध्ये दोघांनीही रोमँटिक पोज दिल्या आहेत. समुद्राच्या किनाऱ्यावर त्यांचा हा समारंभ पार पडला . त्यांनी केक कापून त्याचा आनंद सेलिब्रेट केला. यावेळी त्यांचे कुटुंबीय आणि जवळचे मित्र उपस्थित होते. सध्या, सोनारिकाच्या पोस्टनंतर कमेंटमध्ये अभिनंदनाचा वर्षाव केलाय.

# 'जरा तोंडाला आवर घाला' बबीता भडकली...

तारक मेहता का उल्टा चष्मामध्ये बबिताची भूमिकेतून लोकप्रिय झालेली अभिनेत्री मुनमुन दत्ता ही तिच्या याच आयकॉनिक भूमिकेसाठी आणि सुंदरतेसाठी ओळखली जाते. ती सोशल मिडियावरही चांगलिच सक्रिय असते. तिच्या चाहत्यांची संख्याही कमी नाही. जशी ती जेठालालच्या मनावर राज्य करते तशीच ती तिच्या चाहत्यांच्या मनातही आहे. मात्र तिचा एक व्हिडिओ सध्या व्हायरल होतं आहे.

ती अलीकडेच या वर्षाच्या ITA पुरस्कारांमध्ये सहभागी झाली होती. त्यावेळी ती एंट्री करताच तिच्या वागण्याने सर्वांचे लक्ष वेधलं. तिने रेड कार्पेटवर चालत असताना तिने तिचं संतूलन गमावलं आणि पापाराझींना चांगलाचं फटकारलं आणि यामूळे एकच चर्चा रंगली आहे. यावेळी मुनमुनने हिरव्या रंगाचा ड्रेस परिधान केला होता. त्यासोबतच सिल्वर कानातले आणि केसांचा बन आणि डार्क मेकअप केला होता. रेड कार्पेटवर पोज दिल्यानंतर ती मीडियाशी संवाद साधण्यासाठी पुढे आली. ती अचानकच भडकली आणि म्हणाली, "हे सगळे जे मागे उभ राहून कमेंट करताय , जे नंतर व्हिडिओ पाहिल्यानंतर एकू येत ते जरा कमेंट करण बंद करा. आजकाल तसा ग्रूपचं तयार झाला आहे आज काल." त्यानंतर तिने आयटीए अवॉर्ड्सवर मीडियाच्या प्रश्नाला उत्तर दिले आणि म्हणाली, "आयटीए हा एक मोठा ब्रँड आहे. यासंबंधित असणे हा नेहमीच एक मोठा सन्मान आहे आणि मी एक पुरस्कार देखील सादर करत आहे.



# जॅकलीन कोर्टात हजर... दिलासा नाहीच!

जॅकलीन फर्नांडिसची चित्रपटामधूनही जितकी चर्चा झाली नसेल तितकी मनी लॉंड्रिंग प्रकरणात झाली आहे. सुकेश चंद्रशेखर याने २०० कोटी रुपयांच्या फसवणुकीशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात चित्रपट अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिस सोमवारी पटियाला हाऊस कोर्टात पोहोचली . फसवणूक प्रकरणी सहआरोपी जॅकलिनविरुद्ध आज न्यायालयात आरोप निश्चित केले जाणार होते, मात्र ईडीच्या विनंतीवरून सुनावणी पुढे ढकलण्यात आली. ईडीच्या विनंतीवरून या प्रकरणाची सुनावणी 20 डिसेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आली. आजच्या सुनावणीदरम्यान, ईडीच्या वकिलांनी न्यायालयाला सांगितले की ते पुढील युक्तिवादासाठी अद्याप पूर्णपणे तयार नाहीत. त्यामुळे या प्रकरणाच्या पुढील सुनावणीची तारीख निश्चित करण्याची विनंती न्यायालयाला करण्यात आली . ईडीच्या विनंतीवरून पटियाला हाऊस न्यायालयाचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश शैलेंद्र मलिक यांनी या प्रकरणाची सुनावणी २० डिसेंबरपर्यंत पुढे ढकलली.

सुकेश चंद्रशेखरने खंडणीसह गुन्हेगारी कृत्यांमधून जॅकलीन फर्नांडिसला ५.७१ कोटींच्या विविध भेटवस्तू दिल्या होत्या. चंद्रशेखर बराच काळ तिचा साथीदार होता. सुकेशने सहआरोपी पिंकीच्या माध्यमातून जॅकलीनला या भेटवस्तू दिल्या होत्या' असे ईडीने एका निवेदनात म्हटले होते. चंद्रशेखरने फर्नांडिसला भेटवस्तू देण्यासाठी बेकायदेशीर पैशांचा वापर केला, असा आरोपही ईडीने केला आहे. आता या प्रकरणाची सुनावणी २० डिसेंबरपर्यंत पुढे ढकलली.



# विवाहित असूनही अनेकदा प्रेमात पडलाय आमिर..

बॉलीवूडचा परफेक्शनिस्ट म्हणून आमिर खानकडे पाहिलं जातं. आमिरनं आपल्या संपूर्ण फिल्मी कारकिर्दित वेगवेगळ्या भूमिका साकारल्या आहेत. आणि त्याच्या जवळपास सर्वच भूमिका प्रेक्षकांनी डोक्यावर उचलून धरल्या. अर्थात लाल सिंग चड्ढा सिनेमातील त्याची ड्रीम व्यक्तिरेखा त्याला अपवाद ठरेल. कारण या सिनेमाला लोकांनी ट्रोल तर केलंच शिवाय बॉक्सऑफिसवर सिनेमा दणकून आपटला. अन् आमिरचं मोठं नुकसान झालं. आमिरचं सर्वात वाईट ट्रोलिंग म्हणजे सध्या वयाच्या साठीकडे आले असताना त्याचं नाव तिशीतल्या फातिमा सना शेख या अभिनेत्रीशी जोडलं जात आहे. आता फातिमा काही पहिलीच अशी अभिनेत्री नाही,जिच्यासोबत आमिरचं नाव जोडलं गेलंय. अशा अनेक टॉपच्या अभिनेत्री आहेत ज्यांच्यासोबत आमिरचं सूत जुळल्याची चर्चा त्याचं लग्न झालेलं असताना सुद्धा रंगली होती. चला,आज जाणून घेऊया आमिरच्या अशाच काही सीक्रेट्स अफेअर्सविषयी...



# RRR 'ऑस्कर' च्या आणखी जवळ! 'गोल्डन ग्लोब'साठी नॉमिनेशन



जगप्रसिद्ध ऑस्कर पुरस्कार सोहळ्यासाठी अवघ्या काही दिवसांचा कालावधी शिल्लक राहिला असताना त्यामध्ये आता आणखी समस्त भारतीयांच्या दृष्टीनं आनंदाची बातमी समोर आली आहे. ती बातमी एस एस राजामौलींच्या आरआरआऱ मुव्हीशी संबंधित आहे.

गेल्या काही दिवसांपासून आरआरआऱ हा चित्रपट ऑस्करच्या शर्यतीत असल्याचे बोलले जात आहे. त्याला ऑस्कर मिळावं यासाठी निर्माते आणि दिग्दर्शक यांनी मोठा प्रचार प्रसार सुरु केला आहे. आता आरआरआरच्या बाबत एक महत्वाची बातमी समोर आली आहे ती म्हणजे या चित्रपटाला गोल्डन ग्लोबचे नॉमिनेशन मिळाले आहे. त्यामुळे चाहत्यांमध्ये मोठ्या आनंदाचे वातावरण आहे.

बऱ्याच दिवसांपासून राजामौली यांच्या आरआरआरवर वेगवेगळया पुरस्काराचा वर्षाव होताना दिसतो आहे. भलेही भारतातून ऑस्करसाठी आरआऱआरचे नाव गेले नसेल मात्र या चित्रपटाचा वेगळाच प्रभाव हॉलीवूडमध्ये दिसून येतो आहे. यंदाच्या ऑस्कर सोहळ्यात आरआऱआऱच्या नावावर शिक्कामोर्तब होणार असल्याचा अंदाज चाहत्यांना आहे. सोशल मीडियावरही हा विषय ट्रेंडिंग होताना दिसतो आहे. आता आरआरआरला गोल्डन ग्लोबचे नॉन इंग्लिश भाषेतील सर्वोत्कृष्ट चित्रपट म्हणून नॉमिनेशन मिळाले आहे. यामध्ये ऑल क्वाएट वेस्टर्न फ्रंट, अर्जेंटिना १९८५, क्लोझ, डिसिजन टू लिव्ह या चित्रपटांचाही समावेश आहे.

## दुसरी कसोटी जिंकत रचला इतिहास

# इंग्लंडने पाकला घरच्या मैदानात चारली पराभवाची धूळ!

**। चट्टोग्राम ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**

इंग्लंडने पाकिस्तानचा दुसऱ्या कसोटी देखील 27 धावांनी पराभव करत तीन सामन्यांच्या मालिकेत 2 - 0 अशी विजयी आघाडी घेतली. इंग्लंडने पाकिस्तानसमोर दुसऱ्या डावात विजयासाठी 355 धावांचे आव्हाव ठेवले होते. मात्र चौथ्याच दिवशी पाकिस्तानचा संपूर्ण संघ 328 धावात माघारी परतला. पाकिस्तानकडून सौऊद शकीलने 94 धावा करत झुंज दिली. मात्र मार्क वूडने पाकिस्तानच्या फलंदाजीचं कंबरडेच मोडले. त्याने दुसऱ्या डावात 4 विकेट घेतल्या. इंग्लंडने तब्बल 22 वर्षानंतर पाकिस्तानचा पाकिस्तानमध्ये पराभव केला.दुसऱ्या कसोटी इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना पहिल्या डावात 281 धावा केल्या होत्या. पाकिस्तानचा पदार्पण करणाऱ्या अब्रार अहमदने 7 विकेट्स घेतल्या. इंग्लंडकडून डकेट (63) आणि ऑली पोप (60) यांनी चांगले योगदाकन दिले.पाकिस्तानला मात्र मिळालेल्या संधीचा फायदा उचलता आला नाही. पाकिस्तानचा पहिला डाव 202 धावात संपुष्टात आला. पाकिस्तानकडून कर्णधार बाबर आझमने 75 तर सौऊद शकीलने 63 धावांचे योगदान दिले. तर इंग्लंडकडून जॅक लिचने 4 विकेट घेत चांगला मारा केला. दरम्यान, दुसऱ्या डावात इंग्लंडने दमदार फलंदाजी करत 275 धावा उभारल्या. पहिल्या कसोटीत शतकी खेळी करणाऱ्या हॅरी ब्रुकने दुसऱ्या कसोटीच्या दुसऱ्या डावात देखील 108 धावांची शतकी खेळी केली. इंग्लंडचा सलामीवीर डकेटने 98 चेंडूत आक्रमक 79 धावा करून चांगली सुरूवात करून दिली होती. त्याने पहिल्या डावात देखील 63 धावा केल्या होत्या. यानंतर स्टोक्सनेही 41 धावांचे योगदान देत पाकिस्तानसमोर दुसऱ्या डावात विजयासाठी 355 धावांचे आव्हान ठेवले.



पाकिस्तानकडून पदार्पण करणाऱ्या अब्रारने 4 विकेट्स घेतल्या. दुसऱ्या डावात पाकिस्तानच्या फलंदाजांनी झुंजारपणा दाखवला. पहिल्या डावात दमदार खेळी करणाऱ्या सौऊद शकीलने दुसऱ्या डावातही 94 धावांची खेळी केली. इमाम उल हकने 60 मोहम्मद नवाझने 45 तर अब्दुल्ला शफिकने देखील 45 धावांचे योगदान दिले. मोहम्मद नवाझ आणि शकील खेळत असताना पाकिस्तानने 6 बाद 290 धावांपर्यंत मजल मारली होती.

## स्मृती मंधानाने रचला इतिहास

**नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया महिला संघादरम्यान सध्या पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळली जात आहे. या मालिकेतील दुसरा सामना रविवारी पार पडला. डीवाय पाटील स्टेडियमवर पार पडलेल्ला सामन्यात भारतीय संघाने शानदार विजय मिळवला. सुपर ओव्हरमध्ये भारताने ४ धावांनी विजय नोंदवला. या विजयात स्मृती मंधानाने महत्वाची भूमिका निभावली. त्याचबरोबर तिने एका विक्रमाला देखील गवसणी घातली आहे.

**कॅप्टन कौरनंतर 'ही' कामगिरी करणारी दुसरी भारतीय खेळाडू**



### टी-20 आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये स्मृती मंधानाच्या 2500 धावा पूर्ण

**भारतीय महिला संघासाठी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २५०० हून अधिक धावा करणारी स्मृती मंधाना ही दुसरी महिला खेळाडू ठरली आहे. तिच्या आधी हे विशेष पराक्रम फक्त हरमनप्रीत कौरच्या नावावर नोंदवला गेला होता. कौरने देशासाठी १३९ सामने खेळताना१२५ डावांत २७.३६ च्या सरासरीने २७३६ धावा केल्या. त्याचवेळी, मंधानाने तिच्या १०४ व्या सामन्यातील १०० व्या डावात ही विशेष कामगिरी केली आहे. मंधानाने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २५४४ धावा केल्या आहेत.**

## रोमांचक सामन्यात इंग्लंडचा २६ धावांनी विजय

### मायदेशात पाकिस्तानने गमावली सलग दुसरी मालिका

**नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**

पाकिस्तान आणि इंग्लंड संघांत तीन सामन्यांची कसोटी मालिका खेळली जात आहे. या मालिकेतील दुसरा सामना सोमवारी पार पडला. या सामन्यात इंग्लंडने पाकिस्तानला ३५५ धावांचे लक्ष्य दिले होत. परंतु पाकिस्तान संघाचा डाव ३२८ धावांवर आटोपला. त्यामुळे पाहुण्या संघाने यजमानांवर २६ धावांनी विजय मिळवला. त्याचबरोबर मालिकेत २-० ने विजयी आघाडी घेतली. इंग्लंड संघाने २२ वर्षानंतर पाकिस्तानचा दौरा करताना सलग दुसरा सामना जिंकला आहे.

इंग्लंडने पहिल्या डावात २८१ धावा आणि दुसऱ्या डावात २७५ धावा केल्या होत्या. बाबर आझमच्या नेतृत्वाखालील पाकिस्तान संघाला पहिल्या डावात केवळ २०२ धावा करता आल्या. अशाप्रकारे त्यांना ३५५ धावांचे लक्ष्य मिळाले होते. पाकिस्तानचा लेगस्पिनर अबरार अहमदने पदार्पणाच्या कसोटीत ११ विकेट घेतल्या, पण तो संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही. मायदेशात सलग दुसऱ्या कसोटी मालिकेत पाकिस्तानचा पराभव झाला. याआधी ऑस्ट्रेलियाने ३ सामन्यांच्या मालिकेत त्यांचा १-० असा पराभव केला होता. सामन्याच्या चौथ्या दिवशी पाकिस्तानने दुसऱ्या डावात ४ बाद १९८ धावांरुन पुढे खेळायला सुरुवात केली. रूटने संघाला पहिला धक्का दिला. फहीम अश्रफ १० धावा करून बाद झाला. २१० धावांत ५ विकेट पडल्यानंतर सौद शकील आणि मोहम्मद नवाज यांनी संघाला सांभाळले. दोघांनी सहाव्या विकेटसाठी ८० धावा जोडून सामना रोमांचक बनवला. मात्र नवाज ४५ धावा करून वेगवान गोलंदाज मार्क वुडचा शिकार ठरला.



### शकीलला पूर्ण करता आले नाही शतक

शकीलने सामन्यात चांगली कामगिरी केली. पहिल्या डावात ६३ धावा करणाऱ्या शकीलने दुसऱ्या डावातही २१३ चेंडूत ९३ धावांची संघर्षपूर्ण खेळी केली. वुडनेही त्याला पॅव्हेलियनमध्ये पाठवले. अबरार अहमदने १७ धावा केल्या तर जाहिद मोहम्मद खातेही उघडू शकला नाही. संघाच्या ९ विकेट ३१९ धावांत पडल्या होत्या. ओली रॉबिन्सनला शेवटची विकेट मिळाली. त्याने मोहम्मद अलीला यष्टिरक्षक ओली पोपकरवी झेलबाद केले. आघा सलमान २० धावा करून नाबाद राहिला. वेगवान गोलंदाज मार्क वुडने दुसऱ्या डावात ४ विकेट्स घेतल्या.

## पुणे जिल्ह्यातून महाराष्ट्र केसरीसाठी रोहीत जावळकर

**भुकूम ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**

महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी माती विभागातून रोहीत जावळकर (ता. हवेली) याची निवड झाली. गादी विभागातून तुषार रायते (ता. दौंड) याची निवड झाली. जिल्हा कुस्तीगीर संघाचा महाबाली केसरीचा सन्मान ओंकार येलभर (ता. शिरूर) याने मिळविला.

भुकूम (ता. मुळशी) येथील ग्रामस्थांनी पुणे जिल्हा निवड चाचणी कुस्ती स्पर्धा आयोजित केल्या होत्या.

माती व गादी विभागातून दहा गटात स्पर्धा झाल्या. ओंकार येलभर याने तेजस काळे (ता. इंदापूर) यास चुरशीच्या लढतीत पराभूत केले. स्व. वस्ताद रामभाऊ कारले यांच्या स्मरणार्थ त्यास चांदिची गदा देण्यात आली. यावेळी माती विभागात विजयी झालेले पहिलवान पुढील प्रमाणे. 97 कि. तेजस काळे (इंदापूर), 92 कि. बाबासाहेब तरंगे (इंदापूर), 86 कि. संतोष पडळकर (बारामती) 79 कि. शुभम शेटे (भोर), 74 कि. अरूण खेंगले (खेड), 70 कि. अनिल कचरे (इंदापूर) 65 कि. विकास लोणकर (बारामती), 61 कि. अमोल वालगुडे (वेल्हा), 57 कि. ओंकार निगडे (भोर) माती विभाग 97 कि.ओंकर येलभर (शिरूर), 92 कि. अभिजित भोईर (मुळशी), 86 कि. प्रतिक जगताप (पुरंधर), 79 कि. अक्षय चोरघे (हवेली), 74 कि. रणजित जाधव (इंदापूर), 70 कि. आबा शेंडगे (शिरूर) 65 कि. केतन घारे (मावळ), 61 कि. सनी केदारी (मावळ), 57 कि. स्वपनील शेलार (बारामती). भुकूम येथील माजी उपसरपंच सचिन आंग्रे, सचिन हगवणे, अंकुश खाटपे, निलेश ननावरे, माऊली आंग्रे, रामदास आंग्रे, राजेंद्र आंग्रे, अमोल आंग्रे, विशाल हगवणे, यांनी कुस्त्यांचे नियोजन केले. यावेळी पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष संदिप भोंडवे, हिंद केसरी योगेश दोडके, विलास कथुरे, पाडूरंग खाणेकर, मारूती आडकर, मेघराज कटके, शिवाजी तांगडे, चंद्रकांत मोहोळ यांनी कुस्त्यांचे निर्णय जाहीर केले.



माजी उपमहापौर दिपक मानकर, नियोजन मंडळाचे माजी सदस्य राजाभाऊ हगवणे, माजी सभापती बाळासाहेब चांदेरे, रविंद्र कंधारे, माजी जिल्हा परिषद सदस्य शंकर मांडेकर, शांताराम इंगवले, बाबाजी शेळके, सचिन जांभूळकर उपस्थित होते. ग्रामस्थांनी कुस्ती आखाड्याचे चांगले नियोजन केले होते.